Shri Shivaji Education Society, Amravati's

# Shri Shivaji College of Arts, Commerce and Science, Akola

NAAC Reaccredited with A grade with CGPA 3.24 / UGC status of College with Potential for Excellence/ DST-FIST Level 0

Lead College status by S.G.B.A.U. Amravati



University level Workshop

On

**Credit, Grade & Semester System introduced by S.G.B. Amravati University and Maharashtra Public Universities Act, 2016.**

Organized by

Internal Quality Assurance Cell (IQAC)

July 22, 2017

# CERTIFICATE

This is to certify that Mr/Mrs/Miss/Dr/Prof. S. B. Manwar of Shri Ganesh Arts College, Kumbhari

has participated in one day University level Workshop on Credit, Grade & Semester System introduced by S.G.B. Amravati University and Maharashtra Public Universities Act, 2016.

| | | |
|---|---|---|
| **Mr. S. M. Palhade** | **Dr. A. S. Raut** | **Dr. S. G. Bhadange** |
| Organizing Secretary | Convener | Principal |

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

(NAAC Accredited with "A" Grade)

# Certificate

*This is to certify that*

*Mr./Mrs./Ms./Dr.* Sudhakar B. Manwar *Designation* Asst. professor

*from* Shri Ganesh Arts college, Kumbhari.

*has participated in the One Day*

## *NAAC Accreditation Awareness Workshop*

*For Affiliated colleges in Akola & Buldana Districts*

*Jointly Organised by* ***IQAC, Sant Gadge Baba Amravati University, Amravati &***
***Shri Shivaji College of Arts, Commerce & Science, Akola***
*held at Shri Shivaji College of Arts, Commerce & Science Akola on*
*24th November, 2017*


**Dr. S.G. Bhadange**
Principal
Shri Shivaji College of Arts, Commerce & Science, Akola

**Dr. S.F.R. Khadri**
Director, IQAC
Sant Gadge Baba Amravati University

Inter Disciplinary Journal
DARJ
ISSN 0975-590X

# DECISION AND ACTION RESEARCH JOURNAL

Inter Disciplinary Journal
Peer Reviewed / Referred Journal



DARJ APPROVED

## Certificate of Publication

This is Certify that

Prof./Dr./Mr./Miss. Sudhakar B. Manwar

has contributed a paper as author / Co-author to title

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - एक बहुआयामी व्यक्तित्व.

and has got published in Vol. 09 Issue 01 Special Issue 2017. The Editor in Chief and the Editorial Board appreciate the intellectual contribution of the Author / Co-author.

| Dr. Subhash Gawai | Dr. Rajiv Borkar | Rameshwar Bargat |
| --- | --- | --- |
| CHIEF EDITOR | GUEST EDITOR | ORGANIZING SECRETARY |

*Run by DARJ Training & Research Institute, Amravati Rg. No. MAH/189/12
**Recommended by Sant Gadge Baba Amravati University, Amravati, Dir. No. 37/2012
***Financial Assistant of Indian Council of Social Science Research, Mumbai (ICSSR)/DARJ-83/676/12

Peer Reviewed and Referred Journal / ISSN 0975-590X

# DECISION AND ACTION RESEARCH JOURNAL

Inter Disciplinary Journal

DARJ

CHIEF EDITOR
**Dr. Subhash Gawai**

---

GUEST EDITOR
**Dr. Rajiv Borkar**

---

SPECIAL ISSUE EDITORIAL BOARD

| | |
|---|---|
| **Dr. Pravin Deshmukh** | **Anil Dadmal** |
| **Dr. Sopan Watare** | **Mohan Bullal** |
| **Dr. Kunal Ingle** | **Dr. Santosh Suradkar** |
| **Prof. Sunil Kolhe** | **Prof. Siddharth Waghmare** |
| **Dr. Umesh Chapke** | **Dr. Shrikrishna Kakde** |
| **Raju Sarkate** | **Ku. Priti Ingle** |
| **Devanand Mohod** | **Sandhya Mhaske** |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 41. | राष्ट्रसंताचे शिक्षण विषयक विचार | श्री. दत्तात्रय जोशी | 102 |
| 42. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे खंजेरी भजनाद्वारे सांगितीक योगदान | श्री. प्रशांत झि. बागडे | 105 |
| 43. | राष्ट्रसंतांचे ग्रामसुधारण विषयक विचार | डॉ. किशोर एन. देशमुख | 107 |
| 44. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सांगितीक दृष्टिकोण | श्रीमती कल्पना जैन | 109 |
| 45. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे राजकीय विचार व कार्य | डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड | 112 |
| 46. | राष्ट्रनिर्माणकरिता शिक्षण व जीवन यांचा ग्रामगीतेतील अनुबंध | श्री. कैलास सुदामराव वानखडे | 115 |
| 47. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाज सुधारणाविषयक विचार | डॉ. शरद जानराव वाघोळे | 118 |
| 48. | राष्ट्रसंत के शिक्षा के सम्बन्ध में विचार | श्रीमती छाया गु. जाधव | 121 |
| 49. | राष्ट्रसंत का सांगितीक दृष्टीकोण | श्रीमती अनिता शर्मा | 123 |
| 50. | तुकडोजी महाराजांचे शिक्षणविषयक विचार | श्री. संतोष नारायणराव वावगे | 125 |
| 51. | राष्ट्रसंताचे आर्थिक, राजकीय व सामाजिक विचार | श्री.तुकाराम विठ्ठलराव कांबळे | 127 |
| 52. | Life Education is Gramgeeta | T.K. Kanthale | 131 |
| 53. | Rashtrasant Tukdoji Maharaj and his Musical Contribution | Dr. Shweta D. Vegad | 133 |
| 54. | Indianess in the Work of Arvind and Tukdoji Maharaj | Rupesh S. Wankhade | 136 |
| 55. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे संगीताच्या माध्यमातून समाजप्रबोधन | श्री. सुशील अण्णाजी वावरकर | 140 |
| 56. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार व कार्य | कु. रश्मी दहापुते | 142 |
| 57. | लोकशिक्षक संत तुकडोजी महाराज | श्री. नंदकुमार गणेशराव भाकरे | 146 |
| 58. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सांगितीक माध्यमातुन राष्ट्रीय व सामाजिक प्रबोधन | श्रीमती प्रिती बी. इंगळे | 149 |
| 59. | तुकडोजी महाराजांनी संगीताच्या माध्यमाने केलेले समाज प्रबोधन व जनजागृती | श्री. एस. के. खंडारे | 153 |
| 60. | वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – एक बहुआयामी व्यक्तित्व | श्री. सुधाकर बंडूजी मनवर | 155 |
| 61. | राष्ट्रसंताचे स्त्रीविषयक विचार | हरिचंद ना. नरेटी<br>कु. भावना रोडे | 157 |
| 62. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रामगीतेतील सामाजिक विचार | श्री. आर. आर. पाटील | 160 |
| 63. | राष्ट्रसंतांचा सांगितीक दृष्टिकोण | श्री. हर्षवर्धन मानकर | 162 |
| 64. | राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सांगितीक योगदान | श्री. अमोल वासुदेवराव गावंडे | 163 |
| 65. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अनमोल विचारधन | श्री. उमेश आर. धुमाळे | 166 |
| | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शैक्षणिक विचारातील द्रष्टेपण | अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ | 168 |
| 67. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे मानव अधिकाराबाबत विचार | श्री. संतोष मिसाळ | 171 |
| 68. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा सांगितीक दृष्टीकोण | श्रीमती विद्या प्र. गावंडे | 174 |
| 69. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्री विषयक विचार | श्री. दलित सुभाषराव कांबळे | 176 |
| 70. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचे अध्ययन | श्री. सिध्दार्थ पाटील | 178 |
| 71. | राष्ट्रसंत तुकडोजी का हिन्दी काव्य में योगदान | श्रीमती. वैशाली काशिनाथ सोनोने | 181 |
| 72. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सामाजिक व ग्रामस्वराज्यासंबंधीचे विचार एक दृष्टी | श्री. शेषराव सखाराम तायडे | 184 |
| 73. | वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज के "ग्रामगीता" में ग्रामविकास संकल्पना | डॉ. निभा शांतीलाल उपाध्याय | 187 |
| 74. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शेतकऱ्यांविषयी विचार | श्री. विष्णु ब. पवार | 190 |
| 75. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : ग्रंथ साहित्य | श्री. इंद्रसिंग पांडूरंग पवार | 191 |
| 76. | ग्रामगीतेतील गोवंश सुधार – ग्रामोन्नतीचा आधार | सतपाल विजयराव सोवळे | 193 |
| 77. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – एक श्रेष्ठ समाजसुधारक | श्री. प्रसन्न बगडे | 196 |
| 78. | ग्रामिण विकासात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सामाजिक विचारांचे योगदान | श्री. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 197 |
| 79. | शानदार हो मेरा भारत | डॉ. हरिदास देविदास आखरे | 201 |
| 80. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक, शैक्षणिक व साहित्य विचार : एक आकलन | डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे | 203 |

# वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज -एक बहुआयामी व्यक्तिमत्व

सहा.प्रा. सुधाकर बंडुजी मनवर
संगीत विभाग
श्री गणेश कला महाविद्यालय,
कुंभारी ता.जि. अकोला

**प्रस्तावना :-**

संपूर्ण विश्वामध्ये भारतभूमि ही आध्यात्मीक व संतांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेली भूमि म्हणून वेगळी ओळख जोपासून आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्र हे संतांची खाण म्हणून ओळखले जाते. त्यातही वैराग्यमुर्ती, कर्मयोगी गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणजे विसाव्या शतकातील समाजप्रबोधनाचे जणू सुर्य व चंद्र होत. संत गाडगे बाबा अक्षरशत्रु होते तर राष्ट्रसंत अक्षरांची खैरात करणारे प्रतिभासंपन्न कवी होते. गाडगे बाबांच्या किर्तनातील वैखरी ही त्यांच्या समाजप्रबोधनाची खरी शब्द समशेर होती. त्या द्वारेच त्यांनी समाजातील अनिष्ट रूढी परंपरा संपुष्टात आणल्या तर राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेतून समाज परिवर्तनाचा एक सुंदर नकाशाच संपुर्ण मानव समाजासमोर ठेवला. खरे तर संत गाडगे बाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाजप्रबोधन कार्याची नाळ एकच होती. ज्याप्रमाणे चिखलातून कमळाचा जन्म होतो आणि तेच कमळ आपल्या शतशत सुगंधीत पाकळ्यांनी आसमंत दरवळून टाकतो. तद्वतच एका चंद्रमोळी झोपडीत दि. 30.04.1909 रोजी जन्मलेल्या माणिक ने जगभर आपल्या सत्कार्याच्या किर्तीचा सुगंध पसरविला. समाजोध्दारातून भारतोध्दाराकडे झेपावणाऱ्या तुकडोजीने आपल्या विचार कार्याचे माणिक–मोती जगभर पसरविले. राष्ट्रसंतांनी जगाला मानवधर्म काय आहे याची आपल्या खंजेरी भजनातून आणि साहित्यातून संपूर्ण विश्वाला ओळख करून दिली.

वंदनिय राष्ट्रसंत हे जनसाहित्यकार होते. त्यांनी जनप्रेमधून साहित्य निर्मिती केली. तत्कालीन पांढरपेशी व बडेजाव करणारे साहित्यीक मंडळी त्यांना साहित्यीक मानायला तयार नव्हते. परंतू महाराजांनी आपला समाजोध्दाराचा उद्देश न सोडता साहित्य निर्मिती सुरूच ठेवली. 1955 मध्ये ग्रामगिता ग्रंथाच्या प्रकाशनानंतर खऱ्या अर्थाने विदर्भ साहित्य संघाने त्यांना सन्मानपूर्वक आमंत्रण दिले. राष्ट्रसंतांनी केवळ मराठीतूनच नव्हे तर हिंदी भाषेतून सुध्दा साहित्य लिखाण केले. त्यांनी मराठी गद्य साहित्यामध्ये एकूण 1160 भजने, 1209 अभंग, 678 श्लोक, 5949 ओव्या,10 पोवाडे आणि 11 मंगलाश्टके लिहिली तर हिंदी साहित्यामध्ये 2369 भजने, 1746 बरखा, 1517 सद्विचार, 8 प्रार्थनाष्टके, 5 मंगलाष्टके इ. लिखाण केले. सोबतच 13 आरत्या, 4 स्वागतगिते, 818 सुविचार लिहिलेत. याव्यतिरिक्तही त्यांनी त्यांचे बरेच साहित्य निर्माण केले आहे. अनेक लेख प्रकाशित न झाल्यामुळे आपल्यापर्यंत पोहोचू शकले नाही.

महाराजांनी ***१) अनुभवामृत अभंगवाणी भाग १ - २ :–*** यामध्ये अभंगस्वरूपात रचना केलेल्या आहेत. सुरूवातीला आत्मनिवेदन पर अभंग दिले असून त्यानंतर भक्ती व धर्माचे वर्म यासारख्या विषयांवर आधारित अभंगांची रचना केलेली आहे.

***२) आदेश रचना :–*** या ग्रंथामध्ये सर्वसाधारण समाज एका छत्रछायेखाली आणण्याकरीता एकसुत्रतेची गरज असते. ती एकसुत्रता मानवधर्माच्या नात्याने समाविष्ट करण्यात आलेली आहे. सामुदायीक प्रार्थनेचे महत्व, नवी समाजरचना या बाबींचे यथोचित विवेचन या ग्रंथामध्ये दिसून येते ते खालील श्लोकांवरून सांगता येईल.

देवादिदेवही मानती अवतार गुरूसी पुजती ।
पंथादि आणि धर्मादिही गुरूदेव हा सन्मानित ।।
नचव्यक्ति, श्रीगुरू शक्ति ही गुरूदेव मंडळ स्थापना ।
ऊठ आर्यपुत्रा! झडकरी कर सामुदायिक प्रार्थना ।।

***३) समाजसंजीवनी :–*** या पुस्तकामध्ये वंदनिय महाराजांनी कष्टकरी व शेतकरी मजूर वर्गाला जागृतीचा संदेश दिला आहे.शेतकरी वर्ग साक्षर झाला तरच तो आपला व पर्यायाने राष्ट्राचा सर्वांगिण विकास साधून शकतो. साक्षरते विशयी यामध्ये अनेक रचना आहेत. विविध रचनांमधून त्यांनी शेतकरी वर्गाला साक्षर होण्याची विनंती अतिशय कळकळीने केली आहे. हे पूढील श्लोकातून दिसून येते.

या रे या प्रौढांनो । साक्षर होण्यासाठी जमू
मातांनो, या मिरा जनाई मुक्ताईचा मार्ग क्रमू ।।

***४) क्रांतिविणा :–*** या भजनावलीमध्ये वंदनीय राष्ट्रसंतांनी तरूणांना परिवर्तनशिलतेचा कानमंत्र दिला आहे. परिवर्तनशिल क्रांतीकारी विचारांची भजने यामध्ये समाविष्ट आहेत. आळशी व रिकाम्या लोकांना उद्देशून महाराज म्हणतात –

जना बोल जरा रे । म्हणा रिकामे का राहता ?
देहासी पाहिजे अन्न, वस्त्र, झोपडे ।
हे सर्व आळसाने कैसे तुम्हा आतुडे ।
दुसऱ्याच्या शोशनाशी सुखे पाहता ।।

***५) नवजागृती :–***

समाजपरिवर्तनाच्या प्रेरणेतून अनेक रचना या पुस्तकातून दिसून येतात. समाजातील विषमता, भेदभाव, अस्पृश्यता इ. बद्दलची जागृती या पुस्तकाद्वारे वंदनीय महाराजांनी केली आहे. समाजामध्ये असणारी अंधश्रध्दा दुर करण्यासाठी

महाराज म्हणतात –

मनि नाही भाव म्हणे देवा मला पाव
देव अश्यानं भेटायचा नाही हो।
देव बाजारचा भाजीपाला नाही हो।
मातीचा देव त्याला पाण्याचा भेव।
सोन्याचांदीचा देव त्याला चोराचं भेव।
लाकडाचा देव त्याला अग्निचं भेव।।

**६) अरूणोदय:**- या भजन संग्रहामध्ये वंदनीय महाराजांनी बालपणातील तसेच किशोर अवस्थेतील व अभ्यासाच्या काळातील अनेक रचना अंतर्भूत केलेल्या आहेत. तसेच मनाच्या विविध अवस्था व मानसिक अस्थिरता दर्शविणाऱ्या रचना यामध्ये आहेत.

**७) लोकशाहीचे पोवाडे :**- स्वराज्याची पुर्णता, भजनाचे सार्थक, दारूची दारूणता, ग्रामस्वराज्याची दुर्दशा, उलटी दुनिया, लोकशाहीचा जयजयकार, मतदान कोण करणार, ...कांचं भाग्य उघडलं इ. विषयांवर आधारित स्फुर्तिदायी पोवाड्यांची रचना केलेल्या आहेत. व्यसनांधतेचा धिक्कार करतांना महाराज म्हणतात –

कसं चळलं दारूनं मन हरपलं भान।
पर्वा नाही उरली देहाची ।
लाज खोवीली प्रतिश्ठेची।
जगी नाही किंमत कवडीची ।
कुत्र्यापरी गती झाली त्यांची रें जी जी जी ।।1।।

अशा एकुण 10 पोवाड्यांचा यामध्ये समावेश आहे.

**८) प्रार्थनाष्टक :**- सर्व धर्म सम भाव, स्वातंत्र्य, समता, मानवता, बंधूता, प्रेम, राष्ट्रप्रेम इ. विषय वंदनीय महाराजांनी प्रार्थनाष्टकामधून व्यक्त केले आहे.

**९) आत्मप्रभाव :**-

विघ्नहर्ता गणनायक । सर्वतोपरी मंगलदायक।
जेथे नुरे दैवताचीच भाक । मन विघ्न ते कैसे ।।

याप्रमाणे या ग्रंथातील प्रत्येक ओवी ही ज्ञानकणांनी उपयुक्त आहे. यातील ज्ञान, आध्यात्माची पायरी चढणाऱ्यांना अत्यंत मार्गदर्शक आहे. श्री सुदामजी सावरकर यांनी अत्यंत परिश्रम पूर्वक या ग्रंथांचे संपादन केले आहे.

**१०) ग्रामगीता :**- ग्रामगीता हा ग्रंथ राष्ट्रसंतांनी गावाचा खऱ्या अर्थानी नायक असलेल्या ग्रामनाथ म्हणजेच शेतकऱ्याला अर्पण केला आहे. ग्रंथाच्या सुरूवातीलाच अर्पण पत्रिकेमध्ये याचा उल्लेख करतांना महाराज म्हणतात –

म्हणोनी तुजसी करीतो अर्पण। तु विश्वाचे अधिष्ठान
तुझेची व्हावे आधि उत्थान । विश्वामाजी म्हणूनिया ।।
ऐसेची होवो जनीवनी । संतोष होईल माझीया मनी
मित्रत्व वाढो त्रैभूवनी । तुकड्या म्हणू ध्येय हेची ।।

ग्रामगीता हा ग्रंथ त्यांच्या सर्व साहित्यातील अतिशय महत्वाचा ग्रंथ मानला जातो. राष्ट्रसंतांचे सुध्दा त्यावर अतिशय प्रेम होते.

वंदनीय महाराजांची खंजेरी भजन शैली ही भारती संगीताला मिळालेली एक देणगीच म्हणावी लागेल. ... खंजेरी भजन पध्दती ही एक वेगळी शैली आहे. ही शै... आजही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विकसीत झाले... आहे. अनेक गावांमधून आजही लहान–लहान बालकांपा... तर वयोवृध्दांपर्यंत खंजेरी भजन गातांना दिसून येतात. भजनांमधूनच त्यांची संगीताबद्‌दलची परिपक्व आवड दि... येते. खंजेरी भजन स्पर्धेमधून आजही अतिशय परि... गायीकीने तयार असलेले युवक, बालकांची भजने ऐकाय... मिळतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने शास्त्रीय संगीतची ... ग्रामीण क्षेत्रामध्ये निर्माण होण्यास खंजेरी भजन हे बऱ्याच अं... कारणीभूत ठरते यात शंका नाही. वंदनीय महाराजांच्या अनेक लोकप्रिय खंजेरी भजनांमुळे शिकाऊ भजन गायकांचा शास्त्रीय संगीताकडे कल वाढल्याचे निदर्शनास येत आहे. वंदनीय महाराजांच्या एच.एम.व्ही. कंपनीने त्या काळामध्ये ध्वनीफिती तयार केलेल्या होत्या. तत्कालीन वेळी त्या खुप... लोकप्रिय ठरल्या होत्या व आजतागायत आहे. तसेच आकाशवाणीवरून प्रत्येक गावागावापर्यंत वंदनीय महाराजांची भजने व विचार पोहोचविले. नागपूर, दिल्ली, भोपाळ इ. आकाशवाणी केंद्रांवरून वंदनीय महाराजांनी प्रभावीपणे खंजेरी भजने गायलीत.

अशाप्रकारे वंदनीय राष्ट्रसंतांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आपणांस दिसून येते. वंदनीय राष्ट्रसंतांनी आपल्या कार्याद्वारे या भारत भुमीवर अनंत उपकार करून ठेवलेले आहेत.

**संदर्भ ग्रंथ सुचि :-**


१) *अनुभवामृत अभंगावली, भाग १-२*
२) *आदेश रचना*
३) *समाज संजीवनी*
४) *क्रांतीविणा*
५) *नवजागृती*
६) *अरूणोदय*
७) *लोकशाहीचे पोवाडे*
८) *प्रार्थनाष्टक*
९) *आत्मप्रभाव*
१०) *ग्रामगीता*